Please Consider the Environment Before Printing…

**Date: 01/10/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## गीतकार, कवी मजरूह सुलतानपुरी



मजरूह सुलतानपुरी हे चित्रपट क्षेत्रातील उर्दू कवी आणि गीतकार होते. त्यांचा जन्म १ ऑक्टोबर १९१९ रोजी उत्तर प्रदेशातील सुलतानपूर येथे झाला. त्यांनी अनेक हिंदी चित्रपट साउंडट्रॅकसाठी गीते लिहिली. १९५० आणि १९६० च्या दशकाच्या सुरुवातीला ते भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रमुख गीतकारांपैकी एक होते आणि प्रगतीशील लेखकांच्या चळवळीतील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्व होते. त्यांना २० व्या शतकातील साहित्यातील सर्वोत्तम उर्दू कवींपैकी एक मानले जाते. मजरूह यांनी नाटक (१९४७), डोली (१९४७) आणि अंजुमन (१९४८) सारख्या चित्रपटांसाठी गीते लिहिली, परंतु मेहबूब खान यांच्या अंदाज (१९४९) या चित्रपटाने त्यांना मोठे यश मिळवून दिले. १९४९ मध्ये त्यांच्या राजकीय आरोप असलेल्या कवितांमुळे त्यांना दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली.

मजरुह यांनी चित्रपट कारकिर्दीला नव्याने सुरुवात केली. गुरु दत्त यांच्या 'बाज' (१९५३) चित्रपटातून त्यांना पुन्हा संधी मिळाली. मजरूह सुलतानपुरी यांनी अनिल बिस्वास, नौशाद, गुलाम मोहम्मद, मदन मोहन, ओपी नय्यर, रोशन, सलील चौधरी, चित्रगुप्त, एन. दत्ता, कल्याणजी-आनंदजी, लक्ष्मीकांत-प्यारेलाल आणि आरडी बर्मन यांसारख्या अनेक संगीत दिग्दर्शकांसोबत त्यांनी काम केले. गीतकार म्हणून त्यांचा शेवटचा चित्रपट 'वन २ का ४' होता, जो २००१ मध्ये त्यांच्या मृत्यूनंतर प्रदर्शित झाला. १९६५ मध्ये दोस्ती चित्रपटातील 'चाहूंगा मैं तुझे' या गाण्यासाठी त्यांना फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट गीतकार पुरस्कार आणि १९९३ मध्ये भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार, दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार त्यांना मिळाला. मजरूह यांचे २४ मे २००० रोजी मुंबई येथे निधन झाले.

Nashik Edition
Oct 01, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401